|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. १५ सप्टेंबर २०२६: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात इंडक्शन प्रोग्राम अंतर्गत आज दिनांक १५ सप्टेंबर रोजी 'स्वयंमूल्यांकनातून स्वतःचा शोध, जाणिवांचा जागर' या विषयावर प्रा. डॉ. शोभा शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी डॉ. शोभा शिंदे यांनी स्वतःची ओळख, स्व-जाणीव, भावनिक बुद्धिमत्ता, आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि अपयशातून शिकण्याचे महत्त्व स्पष्ट केले. यशस्वी जीवनासाठी स्वतःच्या भावना ओळखणे, त्यांचे नियंत्रण करणे तसेच इतरांच्या भावना समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढला तरी शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांचे महत्त्व कायम राहणार असून, तंत्रज्ञान आपल्या हावी होऊ नये, असेही त्यांनी नमूद केले.

हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी समस्यांशी संघर्ष करून निरंतर प्रयत्न करत राहावे. स्वतःच्या चुका व उणिवा ओळखून त्यावर मात केल्यास यश निश्चित मिळते, असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी विद्यार्थ्यांनी स्वयंमूल्यांकन, आत्मचिंतन आणि स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. चांगली संगत, स्वच्छ विचार, शिक्षकांशी संवाद आणि संत-महापुरुषांच्या विचारांचे अनुकरण यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, प्रा. प्रतिभा गलवाडे, सहयोगी निखिल तायडे, महेश सूर्यवंशी, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रीती सोनी यांनी केले, तर आभार विद्यार्थिनी हर्षदा महाजन यांनी मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. १५ सप्टेंबर २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात आयोजित इंडक्शन प्रोग्राम अंतर्गत दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी 'विद्यार्थ्यांच्या जीवनात ग्रंथालयाचे महत्त्व' या विषयावर डॉ. चंद्रशेखर वाणी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी डॉ. वाणी यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयातील विविध सुविधा, पुस्तकांची उपलब्धता, संदर्भग्रंथ, संशोधन पेपर, प्रबंध, नियतकालिके तसेच ऑनलाइन पुस्तक शोधण्याच्या सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यापीठाच्या ग्रंथालयात सुमारे ९५ हजार ते १ लाख पुस्तके उपलब्ध असून, विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करून ज्ञानवृद्धी करावी, असे त्यांनी सांगितले. ग्रंथालयातील शिस्त, पुस्तकांची योग्य हाताळणी, ओळखपत्राचा वापर आणि ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी ग्रंथालय हे विद्यापीठाचे ज्ञानस्रोत केंद्र व शैक्षणिक विकासाचा कणा असल्याचे सांगितले. पुस्तक वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात, आकलनात व विचारशक्तीत वाढ होते. मोबाईल व सॉफ्ट कॉपीपेक्षा हार्ड कॉपीतील पुस्तक वाचनाची सवय विद्यार्थ्यांनी जोपासावी आणि ग्रंथालयाचा नियमित वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास सहकारी प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, प्रतिभा गलवाडे, सहयोगी निखिल तायडे, महेश सूर्यवंशी, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन खेमराज पाटील यांनी केले, तर आभार विद्यार्थिनी हर्षदा महाजन यांनी मानले.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. १५ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता